दाखल तारीख : २०/१२/२०१७
नोंदणी तारीख : २०/१२/२०१७
निकाल तारीख : ०८/०४/२०१९
कालावधी : वर्षे, महिने, दिवस
०१, ०३, १८

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा, जि. सोलापूर यांच्या न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी : के.के. माने)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०१/२०१८** **निशाणी क्र.**

**संगोडा चनगोंडा पाटील (मयत),**
**तर्फे वारस**

(१) **श्रीमती सुरेखा संगोंडा पाटील,**
वय – ७२ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. कन्नमवार नगर, विक्रोळी पुर्व, मुंबई

(२) **सौ. सुचेत्रा मल्लीकाजून बिरादार,**
वय – ४५ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. मु.पो.तद्देवाडी, ता. इंडी,
जि. विजापूर, (कनार्टक राज्य)

(३) **सौ. सुमित्रा सोमेश्वर सुपेकर,**
वय – ४३ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. पाटस रोड, बारामती, जि. पुणे

(४) **सौ. संगिता सुनिल नेरली,**
वय – ४२ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. एव्हरशाईन कॉम्प्लेक्स, दुसरा मजला,
वसई, जि. ठाणे

(५) **चनगोंडा संगोडा पाटील,**
वय – ४० वर्षे, धंदा – नोकरी व शेती,
रा. खारेगांव, पाटसजवळ, कळवा, पुर्व ठाणे

(६) **प्रमोद संगोडा पाटील,**
वय – ३५ वर्षे, धंदा – नोकरी व शेती,
रा. विक्रोळी नगर, कन्नमवार नगर, पुर्व मुंबई ...**अर्जदार**

**विरुध्द**

(१) **शिवानंद चिदानंद पाटील,**
वय – ४२ वर्षे, धंदा – शेती,

(२) **चिदानंद चनगोंडा पाटील,**
वय – ७२ वर्षे, धंदा – शेती (एकत्र कुटूंब कर्ता),
दोघें रा. मु.पो.बोराळे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

(३) **मोहन चिदानंद पाटील,**
वय – ४२ वर्षे, धंदा – शेती,
रा. ब्लॉक नं.२५४, सेक्टर, नं.७, जुनी मिल,
मुरारजी पेठ, उमा गृह निर्माण संस्था, सोलापूर ...**सामनेवाला**

**अर्ज – दावा पुन्हा फैलावर घेणेसाठी.**

---

| | |
|---|---|
| अर्जदारांतर्फे अधिवक्ता | – श्री.एम.आर.कवचाळे. |
| सामनेवाला क्र.१ तर्फे अधिवक्ता | – श्री.एस.पी.पाटील. |
| सामनेवाला क्र.२ तर्फे अधिवक्ता | – श्री.एस.बी.पागे. |
| सामनेवाला क्र.३ विरुध्द | – एकतर्फा. |

---

## न्यायनिर्णय
## (दिनांक ०८ एप्रिल, २०१९ रोजी घोषित)

अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज नियमित दिवाणी मुकदमा क्र.२६३/२०१२ हा पुन्हा फैलावर घेणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जदारांचे अर्जाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

[२] अर्जदार यांनी नियमित दिवाणी मुकदमा क्र.२६३/२०१२ हा सामनेवालांविरूध्द मालकी हक्काने कब्जा मिळणेकरिता दाखल केला होता. सदर दावा पुराव्यासाठी नेमला असताना, अर्जदार हे परगावी लांब अंतरावर असल्याने व नोकरीमुळे परराज्यात त्यांना फिरावे लागत असल्याने, ते दाव्याचे कामी हजर राहू शकले नाहीत. तसेच त्यांचे वकिलांची तब्येत बरी नसल्याने, ते देखील दाव्याचे कामी हजर राहू शकले नाहीत. दि.२३/११/२०१७ रोजी दावा पुराव्यासाठी नेमणेत आला होता. त्या दिवशी अर्जदारांचे वकिल इतर न्यायालयीन कामकाजामध्ये गुंतले होते. सदर दिवशी अर्जदारांचे वकिल दुपारी ४ वाजून, ५ मिनिटांनी न्यायालयात हजर झाले असता, त्यांना दावा

निकाली झाल्याचे निदर्शनास आले. अर्जदारांना नाईलाजास्तव अपरिहार्य परिस्थितीमुळे, पुरावा देता आला नाही. अर्जदार यांना संधी न दिल्यास, त्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, त्यांचा दावा पुन्हा फैलावर घेणेत यावा, अशी त्यांनी विनंती केली आहे.

[३] प्रस्तुत कामी सामनेवाला क्र.१ याने नि.क्र.९ येथे त्याचे लेखी म्हणणे दाखल करून, अर्जातील संपुर्ण मजकूर नाकारला आहे. त्याचे कथनानुसार, दाव्यातील मूळ वादी संगोडा पाटील याचे निधनानंतर अर्जदार न्यायालयामध्ये केव्हाही तारखेला आलेले नाहीत. अर्जदार परजिल्हयात राहत असल्याने, त्यांना दावा जमिनीची माहिती नाही. वास्तविक पाहता, मयत संगोडा पाटील याचे पश्चात अर्जदार यांना दाव्याचे कामकाज चालविणेचे नव्हते, म्हणून ते जाणूनबुजून जबाबदारी टाळणेचे हेतूने गैरहजर राहत होते. अर्जदार यांना न्यायालयाने योग्य संधी दिलेली होती व नंतरच कायदेशीरपणे दावा काढून टाकणेत आला आहे. अर्जदार यांचा दावा काढून टाकल्याने, त्यांचे कसल्याही प्रकारचे नुकसान होत नाही. सदर दावा मिळकतीसंदर्भात सामनेवालाने दाखल केलेला नि.दि.मु.क्र.२७१/२०१२ हा प्रलंबित असून, त्याकामी अर्जदार यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी आहे. अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेले कारण चुकिचे आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

[४] प्रस्तुत कामी सामनेवाला क्र.२ हा हजर होवून देखील, त्याने त्याचे म्हणणे दाखल केले नाही. सबब, प्रस्तुत अर्ज त्याचेविरूध्द विना म्हणणे चालविणेत आला. सामनेवाला क्र.३ यांस आर.पी.ए.डी.ने नोटीस बजावणी होवून देखील, तो अर्जाचे कामी हजर न झाल्याने, त्याचेविरूध्द अर्ज एकतर्फा चौकशी चालविणेत आला आहे.

[५] अर्जदार यांचे अर्जातील कथन व त्यांनी दिलेला पुरावा, यावरून अर्जाचे निर्णयाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरती खालील नमूद कारणास्तव निष्कर्ष नोंदविण्यात येतो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी दावा पुन्हा फैलावरती घेणेकरिता संयुक्तीक कारण दिले आहे काय? | होय. |
| २. | आदेश कोणता? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

[६] वरिल मुद्दयावरती भाष्य करणेपुर्वी या ठिकाणी नि.दि.मु.क्र.२६३/२०१२ बाबतची वस्तुस्थिती नमूद करणे आवश्यक आहे. सदर दावा अर्जदार यांचे पुर्वाधिकारी संगोडा चनगौंडा पाटील यांनी दावा मिळकत गट क्र.७४३ मधील जमीन, गोठा व घर यांचा मालकी हक्काने कब्जा मिळावा, यासाठी दाखल केला होता. मूळ वादी मयत झाल्यानंतर

अर्जदार हे दाव्याचे कामी सामील झाले आहेत. परंतु, त्यांनी दाव्याचे कामी हजर होवून पुरावा न दिल्याने, त्यांचा दावा दि.२३/११/२०१७ रोजी त्यांचे पुराव्याअभावी काढून टाकणेत आला आहे.

[७] अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.६ प्रमोद संगोडा पाटील याने त्याचा तोंडी पुरावा नि.क्र.११ येथे नोंदविला आहे. त्याचबरोबर अर्जदार यांनी अर्जाचे कामी नि.क्र.५ येथे नि.दि.मु.क्र.२६३/२०१२ मधील नि.क्र.१ वरील आदेशाची प्रत दाखल केली आहे. त्याचप्रमाणे नि.क्र.२६ येथे नि.दि.मु.क्र.२७१/२०१२ मधील नि.क्र.१ ची प्रत दाखल केली आहे. अर्जदार यांनी पुरावा संपल्याची पुरसिस नि.क्र.१५ येथे दाखल केली आहे.

[८] सामनेवाला क्र.१ याने त्याचे बचावाचे पृष्टयर्थ स्वतःचा तोंडी पुरावा नि.क्र.१६ येथे नोंदविला आहे. त्याने पुरावा संपल्याची पुरसिस नि.क्र.२३ येथे दाखल केली आहे.

**<u>मुद्दा क्र.१ करिता</u> –**

[९] अर्जदार क्र.६ याने अर्ज शाबितीसाठी त्याचा तोंडी पुरावा नि.क्र.११ येथे नोंदविला असून, त्यामध्ये अर्जातील संपुर्ण कथनांचा पुनरूच्चार केला आहे. त्याचे पुराव्यानुसार, त्यांचा दावा पुराव्यासाठी नेमला असताना, अर्जदार हे परगावी लांब अंतरावर असल्याने व नोकरीमुळे परराज्यात त्यांना फिरावे लागत असल्याने, ते दाव्याचे

कामी हजर राहू शकले नाहीत. तसेच दि.२३/११/२०१७ रोजी दावा पुराव्यासाठी नेमणेत आला होता, त्या दिवशी त्यांचे वकिल इतर न्यायालयीन कामकाजामध्ये गुंतले असल्याने व त्यांचे वकिल दुपारी ४ वाजून, ५ मिनिटांनी न्यायालयात हजर झाले असता, त्यांना दावा निकाली झाल्याचे निदर्शनास आले होते. सामनेवाला क्र.१ तर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये त्याने नि.दि.मु.क्र.२७१/२०१२ हा पुराव्यासाठी प्रलंबित असल्याचे मान्य केले आहे. परंतु, त्या दाव्याचे कामी अर्जदारांना पुराव्याची संधी असल्याचे त्यांनी नाकारले आहे.

[१०] सामनेवाला क्र.१ याने त्याचे पुराव्यामध्ये बचावादाखल दिलेले म्हणण्यामधील सर्व बाबींचा पुनरूच्चार केला आहे. त्याचे पुराव्यानुसार, मूळ वादी संगोडा पाटील याचे निधनानंतर अर्जदार हे न्यायालयामध्ये केव्हाही तारखेला आले नाहीत. तसेच मयत संगोडा पाटील याचे पश्चात अर्जदार यांना दाव्याचे कामकाज चालविणेचे नव्हते, म्हणून ते जाणूनबुजून जबाबदारी टाळणेचे हेतूने गैरहजर राहत होते. अर्जदार यांना न्यायालयाने योग्य संधी दिलेली होती व नंतरच कायदेशीरपणे दावा काढून टाकणेत आला आहे. दावा मिळकतीसंदर्भात त्याने दाखल केलेला नि.दि.मु.क्र.२७१/२०१२ हा प्रलंबित असून, त्याकामी अर्जदार यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी आहे. अर्जदारांतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये त्याने अर्जदार क्र.१ मुंबई येथे व अर्जदार क्र.२ तद्देवाडी, ता.इंडी, जि.विजापूर येथे राहत असल्याचे मान्य केले आहे. परंतु, अर्जदार क्र.३ ते ६ हे

कोठे राहतात, याची माहिती नसल्याचे सांगितले आहे. तसेच अर्जदार क्र.५ व ६ हे नोकरीनिमित्त मुंबई येथे राहत असलेबाबत त्यांस माहिती नाही, असे त्याने सांगितले आहे. अर्जदारांचे अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचारण्यात आलेले सूचक प्रश्न त्याने नाकारले आहेत.

[११] अर्जदार यांनी नि.क्र.५ येथे नि.दि.मु.क्र.२६३/२०१२ मधील नि.क्र.१ वरील आदेशाची सत्यप्रत दाखल केली आहे. सदरचा आदेश पाहता, अर्जदार यांचा दावा त्यांचे गैरहजेरीस्तव व पुराव्याअभावी दि.२३/११/२०१७ रोजी काढून टाकल्याचे स्पष्ट होते. अर्जदारांनी त्यांचे अर्जामध्ये व पुराव्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे दावा काढून टाकला, त्या तारखेस अर्जदार हे परगावी राहत असल्याने, ते दाव्याचे कामी उपस्थित राहू शकले नाहीत, असे कारण दिले आहे. अर्जदारांचा दाव्यामध्ये नमूद केलेला पत्ता विचारात घेता, अर्जदार मुंबई येथे राहत असल्याचे दिसून येते. सामनेवाला क्र.१ याने दाखल केलेला नि.दि.मु.क्र.२७१/२०१२ या कामी अर्जदारांना पुराव्याची संधी असल्याचे बचावामध्ये कथन केले आहे.

[१२] वस्तुतः अर्जदार यांनी दाखल केलेला दावा हा स्थावर मिळकतीबाबत असून, त्याकामी त्यांनी मालकी हक्काने दावा मिळकतीचा कब्जा मागितला आहे. याउलट, सामनेवाला क्र.१ याने दाखल केलेला नि.दि.मु.क्र.२७१/२०१२ हा निरंतर

ताकिदीचा असल्याने, त्याकामी अर्जदारांचा मालकी हक्क ठरविता येणार नाही. अर्जदार यांचे दाव्याचे स्वरूप विचारात घेता, त्यांचे दावा मिळकतीवरील हक्क हितसंबंध गुणदोषांवरती ठरविणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे.

[१३] अर्जदार यांचा दावा, स्थावर मिळकतीबाबत असल्याने, त्यांचे न्यायहक्काचे संरक्षण करणेसाठी त्यांना दाव्याचे कामी पुरावा देणेची संधी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसे न केल्यास, त्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सामनेवालाने अर्जास आव्हान दिले असले तरी, अर्जदारांचा दावा पुन्हा फैलावरती घेतल्यास, त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. सामनेवालाचे म्हणणे व त्याने दिलेल्या कबुली पाहता, अर्जदार हे परगावी राहतात, असे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत अर्जदार यांनी त्यांचे अर्जामध्ये व तोंडी पुराव्यामध्ये दिलेले कारण त्यांचा दावा पुन्हा फैलावर घेणेसाठी संयुक्तीक वाटते. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष 'होय' असा देण्यात येतो.

**मुद्दा क्र.२ करिता –**

[१४] अर्जदार यांनी प्रस्तुत कामी त्यांचा नि.दि.मु.क्र.२६३/२०१२ हा दावा पुन्हा फैलावर घेणेची विनंती केली आहे. अर्जदारांचे स्वतःचेच कृत्यामुळे त्यांचा दावा काढून टाकणेत आला आहे, ही वस्तुस्थिती आहे. असे असले तरी, अर्जदार यांचे न्यायहक्काचे संरक्षण करणेकरिता, तसेच त्यांचा दावा स्थावर मिळकतीबाबत असल्याने,

त्याचा निर्णय गुणदोषावरती करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, अर्जदार यांचा काढून टाकलेला दावा पुन्हा फैलावर घेणेसाठी, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. अर्जदार यांचा अर्ज मंजूर न केल्यास, त्यांचे अपरिमित असे नुकसान संभवते. याउलट, सामनेवालाचे कोणतेही नुकसान संभवत नाही. अर्जदार यांना दावा पुन्हा फैलावरती घेणेसाठी दंड करणे न्यायोचित आहे. सबब, मुद्दा क्र.१ चे निष्कर्षाचे अनुषंगाने मुद्दा क्र.२ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

[१] अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

[२] अर्जदार यांचा नियमित दिवाणी मुकदमा क्र.२६३/२०१२ हा पुन्हा फैलावर घेणेसाठी त्यांचा अर्ज रक्कम रु.२,०००/– चे दंडावरती मंजूर करण्यात येतो. सदर दंडाची रक्कम अर्जदार यांनी १५ दिवसांचे आत जमा करावी.

[३] अर्जदार यांनी सदर दंड रक्कमेपैकी रक्कम रू.१,०००/– सामनेवाला क्र.१ यांस द्यावी तसेच उर्वरित रक्कम रू.१,०००/– तालुका विधी सेवा समिती, मंगळवेढा यांचेकडे जमा करावी.

[४] अर्जदार यांनी दंडाची रक्कम जमा केल्यानंतर, त्यांचा दावा फैलावरती घेणेत यावा.

[५] खर्चाबाबत आदेश नाही.

स्वाक्षरित/–

**(के.के. माने)**

दिनांक – ०८/०४/२०१९

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा,
जि. सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : A.P.Hipparagi,

(b) Name of the Court:C.J.J.D. & J.M.F.C., Mangalwedha, Dist.Solapur,

(c) Judgment signed by P.O. on : 10/04/2019

(d) Judgment uploaded on : 10/04/2019